dt. 29/05/19

# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी क्र — ०२२ २६५४ ३०३५ / २६५३ ०२८३
ईमेल - cap.exam@mu.ac.in

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई— ४०० ०९८.

क्र. परीक्षा/कें.मु.कें./ 355 /२०१९ दिनांक : 29 मे २०१९

परिपत्रक :—

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व विधी महाविद्यालये/विद्यापीठ विभाग यांचे प्राचार्य/विभाग प्रमुख यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, प्रथम सत्र २०१९ च्या परीक्षांच्या उत्तरपत्रिका तपासणीचे काम On Screen Marking द्वारे सुरू झालेले आहे. विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, महाविद्यालयातील प्राध्यापकांचा On Screen Marking साठी नोंदणीअभावी उत्तरपत्रिका तपासणीसाठी अल्प प्रतिसाद मिळत आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील Section (VIII) (88) (89) अन्वये विद्यापीठाने घेतलेल्या प्रत्येक परिक्षेचा निकाल त्या विशिष्ठ पाठयक्रमाच्या परीक्षेच्या अखेरच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत जाहिर करणे विद्यापीठास बंधनकारक आहे.

त्याअनुषंगाने, प्रथम सत्र २०१९ विधी परिक्षांचे मुल्यांकन गतिमान करण्यासाठी व निकाल वेळेत लावण्यासाठी विद्यापीठाने जिल्हानिहाय CAP Co-ordinator समिती गठित केली आहे. मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व विधी महाविद्यालये/विभाग यांचे प्राचार्य/विभाग प्रमुखयांना विनंती करण्यात येते की, निकाल वेळेत लावण्यास आपले नेहमीच सहकार्य असते. त्याचप्रमाणे या परिक्षेचे देखील निकाल वेळेत लावण्यास सहकार्य करावे. (सोबत जिल्हानिहाय CAP Co-ordinator समितीची यादी जोडत आहे.)

डॉ. विनोद पाटील.
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

Kamal pc/D/All draft & letters Marthi letter